# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI
(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4
Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## National Service Scheme

**Dr.I.S. Mohurley**
**Programme Coordinator**
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
Email : director.studentwelfaregug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/NSS/ 150/2015** **Dt: 16 /11/2015**

प्रति,

मा. प्राचार्य
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नित
सर्व रासेयो महाविद्यालये.

**विषय : रस्ता सुरक्षा अभियान राबविण्याबाबत.**

संदर्भ : शासन पत्र क्र. अपोमसं (वा.)/४५/नियो/रस्ता सुरक्षा अभियान–२०१६/पुरस्कार/२०१५/४१२४ मुंबई, दि. १९/१०/२०१५.

उपरोक्त संदर्भांकीत विषयानुषंगाने आपणांस कळविण्यात येत आहे की, संयुक्त राष्ट्र संघटनेने मृत्युमुखी पडणाऱ्या व्यक्तींच्या संख्येचे सर्वेक्षण करुन इतर कोणत्याही आजारामध्ये मृत्युमुखी पडणाऱ्या व्यक्तींपेक्षा अपघातामध्ये मृत्युमुखी पडणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण अधिक असल्याचे त्यांचे निदर्शनास आले. रस्ते अपघातामधील मृत्युच्या आकडेवारीचे गांभीर्य लक्षात घेवून सन २०१० ते सन २०२० हे दशक 'रस्ता सुरक्षा दशक' म्हणून जाहीर करुन अपघातातील मृत्युचे प्रमाण कमी करण्याकरिता विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात केलेली आहे.

रस्ते अपघातात मृत पावणाऱ्या तरुणांची संख्या पाहाता रस्ते अपघातांना प्रतिबंध करणे करीता विविध कार्यक्रम आयोजित करणे, तरुणांमध्ये जनजागृती निर्माण करणे यासंबंधी चांगले कार्य करणाऱ्या राज्यभरातील महाविद्यालयांना शासनातर्फे राज्यस्तरीय पुरस्कार दरवर्षी देण्यात येत आहे.

आपल्या महाविद्यालयाकडून संदर्भीय पत्राव्दारे दिलेल्या अटी व शर्तीनुसार गुणांच्या निकषाप्रमाणे विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन 'रस्ता सुरक्षा अभियान' यशस्वीपणे राबवावे व राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव (दोन प्रतित) समन्वयक रासेयो, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचेकडे दि. १० डिसेंबर, २०१५ पर्यंत पाठवावा.

कळावे.
धन्यवाद !

डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले
कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

सहपत्र : पुरस्काराच्या अटी/नियम व गुण विभागणी.

जा.क्र.अपोमसं(वा)/४५/नियो/रस्ता सुरक्षा अभियान-२०१६/पुरस्कार/२०१५/४७२४ दि.:-१९/१०/२०१५

कार्यालय / Office of the
अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य
Additional Director General of Police (Traffic)
Maharashtra
जुने जकात घर, ४ था मजला, डि. डि. इमारत,
शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई - ४०० ०२३.
Old Custom House, 4th Floor, D. D. Bldg.,
S. B. Marg, Mumbai - 400 023.
दुरध्वनी क्र. ०२२-२२६२ ६६५५

प्रति,

मा.कुलगुरू,
गोंडवाना विद्यापिठ,
गडचिरोली.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलगुरूंचे कार्यालय
आवक क्र. 1023 दि. 5/11/15
जावक क्र. 2405 दि. 5/11/15

विषय :- विद्यापिठ स्तरावर ''रस्ता सुरक्षा'' विषयक कार्यक्रम राबविण्याबाबत परिपत्रक......

''रस्ता सुरक्षा अभियान राज्यस्तरीय पुरस्कार''

(१) पुरस्काराचे स्वरूप :-

(I) राज्यस्तरीय पुरस्कार :-

हे पुरस्कार शासनाच्या मंजूरीच्या अधीन राहुन अदा केले जातील.

(II) पुरस्काराच्या अटी/नियम व गुण विभागणी :-

१) विद्यापीठ अंतर्गत सर्वच महाविद्यालयांनी रस्ता सुरक्षा अभियानामध्ये योगदान देणे अपेक्षित आहे.
२) सर्वच विद्यार्थ्यांपर्यंत अभियानाची संकल्पना पोहचणे अपेक्षित आहे.
३) जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेणा-या विद्यापीठांना अधिकचे गुण.

(III) गुणाचे निकष :-

अ) प्रत्यक्ष रस्ता सुरक्षा अभियानामधील उपक्रम जास्तीतजास्त ४० गुण उदा. पथनाटय, घोषवाक्य / प्लेकार्डस धरुन रस्त्याच्या दुतर्फा/ गर्दीच्या ठिकाणी/रेल्वे स्टेशन/बस स्थानक येथे जनजागृती

ब) रस्ता सुरक्षा या विषयावर निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वादविवाद स्पर्धा घेवून जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेणे ३० गुण.

क) सर्वसामान्य चालक व नागरीकामध्ये रस्ता सुरक्षा या विषयी जनजागृतीकरीता केलेले प्रयत्न २० गुण.

ड) विद्यापीठाने आयोजित केलेल्या / महाविद्यालयाने आयोजित केलेल्या युवा महोत्सवामध्ये रस्ता सुरक्षा बाबतीत एका विषयावर स्पर्धा. जास्तीतजास्त २० गुण.

इ) अपघात घडल्या नंतर प्रत्यक्ष जखमींना सहाय्य किंवा प्रथोमचार याबाबत केलेली मदत.जास्तीतजास्त २० गुण.

ई) जनसमुदाया मध्ये व्याख्यानाव्दारे प्रचार आणि प्रसार. जास्तीतजास्त २० गुण.

उ) रोड-शो (हयुमन रॅली) शोभा यात्रा, पथनाटय सादरीकरण इ. जास्तीतजास्त २० गुण.

ऊ) विद्यापीठ स्तरावरील उपक्रम. जास्तीतजास्त २० गुण.

ए) सुबक, आकर्षक पुरस्कार प्रस्तावास. जास्तीतजास्त १० गुण.

ऐ) कार्यशाळेचे आयोजन (संघ नायक, कार्यक्रम अधिकारी, लोकप्रतिनिधी जास्तीतजास्त २० गुण.

इ) आर. टी. ओ. कार्यालया मार्फत वाहन चालविण्याचा परवाना मिळवून देण्याबाबतची कार्यशाळा/शिबीर जास्तीतजास्त १० गुण.

ओ) विद्यार्थी व पालक कार्यशाळेमध्ये रस्ता सुरक्षा बाबत जाणिव जागृती जास्तीतजास्त **१० गुण.**

अं) नाविण्यपूर्व उपक्रम **१० गुण.**

अ:) ज्या विद्यापीठामार्फत जास्तीतजास्त महाविद्यालये, जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी होतील अशा विद्यापीठांना व महाविद्यालयांना जास्तीतजास्त **५० गुण.**

**'' अभियानाची सुरुवात आणि प्रस्ताव सादरीकरनाची तारीख''**

१) **अभियानाची सुरुवात/कालखंड:-** दिनांक ०१ ऑगस्ट २०१५ ते ३१ डिसेंबर २०१५.

२) स्पर्धा महाविद्यालयीन स्तरावर असून महाविद्यालयाच्या पुरस्कारा बरोबरच त्या विद्यापीठाला मानाचा करंडक (फिरता)

३) **निवड प्रकिया जिल्हा स्तरावर पहिल्या दोन महाविद्यालयांचे प्रस्ताव विद्यापीठाकडे शिफारस यासाठी निवड समिती पुढील प्रमाणे:-** समितिने १० डिसेंबर, २०१५ पर्यत प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठविणे.

१) विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवायोजनेचे समन्वयक - अध्यक्ष
२) प्रतिथयश राष्ट्रीय सेवायोजनेचे समन्वयक
३) प्रतिथयश सामाजिक कार्यकर्ता
४) जिल्हा पोलीस वाहतूक विभागातील प्रतिनिधी.
५) जिल्हा समन्वयक, - सचिव (रा. से. यो.)

**(४) विद्यापीठ स्तरीय समिती :-** प्रत्येक जिल्हयातुन जिल्हा समितीने शिफारस केलेल्या प्रस्तावाची छानणी करुन पहिल्या दोन प्रस्तावाची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी शिफारस करताना विद्यापीठने/विद्यापीठाच्या अधिकारात पुरस्कार देऊ शकतात. **विद्यापीठ समितीने हे पुरस्कार राज्य समिती/ वाहतूक विभाग यांचेकडे २० डिसेंबर पर्यत सादर करावेत.** सादर करताना प्रस्तावाच्या गुणांसहित संक्षिप्त तक्ता करुन पाठवावेत.

१) मा. कुलगुरु - अध्यक्ष
२) मा. विभागीय उपसंचालक, उच्च शिक्षण
३) मा. सामाजिक कार्यकर्ता
४) मा. कुलसचिव
५) मा. विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनाचे समन्वयक - सचिव

**(५) राज्यस्तरीय निवड समिती:-**

सर्वच विद्यापीठाकडून शिफारस केलेल्या पुरस्काराची छानणी करणे व पुरस्काराची नांवे घोषित करणे.

१) मा. अपर पोलिस महासंचालक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य ) - अध्यक्ष.
२) मा. कुलगुरु
३) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन.
४) मा. राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, एल्फीस्टन तांत्रीक विद्यालय परिसर,धोबी तलाव, मुंबई.
५) मा. पोलिस अधिक्षक, महामार्ग पोलीस, (मुख्यालय) - सचिव

**(बाळासाहेब पाटील)**
पोलीस अधीक्षक,(मुख्या.)
अपर पोलीस महासंचालक (वा.)
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे करिता.